## आरोपी तर्फे उलटतपास ॲड. डी.एम.बर्गे यांचेकडुन

आमचे व आरोपींचे मध्ये वाटप झालेबाबतचा कागदोपत्री पुरावा हा सातबारा उतारा व ८ अ चा उतारा आहे. हे म्हणणे खरे नाही की, या जमिनीमध्ये बांध नाही. हे म्हणणे खरे नाही की, या जमिनीमध्ये ज्वारीचे पिक एकाच वेळी पेरले होते. आरोपींनी आणलेल्या मजुर बायका माझे ओळखीच्या नव्हत्या. दुसरे कोणीही आमचेमध्ये सोडवासोडव करणेस आले नव्हते. तक्रार देणेस चार दिवसाचा विलंब का झाला याचे कारण मी पोलिसांना सांगितले होते. आईचे व माझे कपडयांना रक्त लागले होते. पोलिसांनी आमचेकडुन रक्त लागलेले कपडे जप्त केले नाहीत. ही घटना घडलेनंतर दोन महिन्यांनी मी सदर शेतात गेलो होतो. या प्रकरणातील आर्टीकल अ, ब, क विळा व काठया पोलिसांनी आणल्या असतील. पोलिसांनी माझे समक्ष सदर मुद्रदेमाल जप्त केला. सदर मुद्रदेमाल पोलिसांनी कधी आणला याची मला माहिती नाही. सदर मुद्रदेमाल आम्हाला दाखवून पोलिसांनी त्याची पडताळणी केली होती. किती दिवसांनी पोलिसांनी मुद्रदेमाल आम्हाला दाखवून पडताळणी केली हे मला सांगता येणार नाही. पडताळणीचे वेळी माझा जादा जबाब पोलिसांनी घेतला होता का याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, विळा, लाकडी दांडके यांची मी बारकाईने पाहणी केली नव्हती. फिर्यादीमध्ये लाकडी दांडके कोणत्या झाडाचे आहे ते मी सांगितले नव्हते. तक्रार दिलेनंतर घटनास्थळी किती दिवसांनी पोलिस आले याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शेतातील कडबा विस्कटला होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर आरोपींनी शेतातील कणसे व कडबा नेहली. आम्ही आरोपीं विरुध्द चोरीची फिर्याद दिली नाही. मी घटनेनंतर दोन महिने गंभीर आजारी होतो. मी सुरवातीचे चार दिवस सरकारी दवाखान्यात

उपचार घेतले व त्यानंतरचे दोन महिने गावातील डॉक्टरांकडे उपचार घेतले. गावातील डॉक्टरांकडे घेतलेल्या उपचारा बाबत मी वैद्यकिय कागदपत्र दाखल करु शकतो. दिनांक ०८/०३/२०१५ रोजी मी, माझी पत्नी व आई यांनी आरोपी व त्यांचे मुलीस विळयाने मारहाण केली अशा आशयाची तक्रार आरोपी क्र.१ ने दि.११/०३/२०१५ रोजी दाखल केली आहे. त्या कामी आम्हा तिघांना अटक झाली होती. तो खटला याच न्यायालयात आहे. सदर घटना वंदना बुधावले, संगिता पोपट जगदाळे यांनी पाहिली होती याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचे तिघांचे रागामुळे ही घटना घडली. हे म्हणणे खरे नाही की, माझे पत्नीचा विळा झटापटीमध्ये मला लागला त्यामुळे मला जखम झाली. हे म्हणणे खरे नाही की, आईला जखमा झाल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ, ब, क ला असलेले हत्यार माझेकडे, माझे आईकडे व माझे पत्नीकडे होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्ष कणसे खुडणीचे काम केवळ मजुर बायका करीत होत्या.

हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.८१२/१० मध्ये सन २०१५ साली मी ज्वारीचे पिक केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्या पिकासाठी मी कांतीलाल जगदाळे यांचे पाणी विकत घेतले होते, आम्ही शेतात गेलेवर आरोपींनी आम्हाला तुझे येथे काही नाही, तु येथे काशला आला असे म्हटले, आरोपी क्र.२ ने दांडक्याने मला व आईला मारहाण केली, आरोपी क्र.३ ने आईचे डोक्यात विळा घातला त्यामुळे तिचे डोक्यात जखम झाली, आरोपी क्र.१ ने विळयाने माझे डोक्यात मारले व डाव्या डोळयाचे वर मारले त्यामुळे मला जखम झाली, तिन्ही आरोपींनी दांडक्याने मला, माझे आईला व पत्नीला बेदम मारहाण केली, मी व माझी आई रक्तबंबाळ झालो, हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व आई तिन ते चार दिवस सरकारी

दवाखान्यात ॲडमिट होतो, माझे डोक्याला टाके घातले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, तक्रार दिले नंतर मी पोलिसांनी घटनास्थळ दाखविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मागील सात ते आठ वर्षापासून मला रक्तदाबाचा त्रास आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला अलीकडेच लकवा मारलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कुटुंबावर आम्हा तिघांचा प्रचंड राग आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला व आईला राग आला की, आम्हाला रागावर नियंत्रण ठेवता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी अनाधिकाराने आम्ही सदर जमिनीमध्ये गेलो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही आरोपींना सांगितले की, या शेतात तुम्ही कणसे खुडू नका व शेतातुन बाहेर जावा. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी सांगितले की, त्यांचे वहिवाटीचे शेत आहे, त्यांनी पिक केले आहे, त्यांनी शाळुचे पिक उपटले आहे व कणसे तेच खुडून नेणार. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शेतातुन जात नव्हते म्हणून आम्ही तिघांनी बाचाबाची केली. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपींना धक्काबुक्की केली, तरी देखील ते थांबत नाहीत म्हणून आम्ही तिघांनी विळयाने व दांडक्यांनी आरोपींना मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी ११ तारखेला आमचे विरुध्द तक्रार दिली म्हणून त्यास शह देणेसाठी १२ तारखेला मी आरोपीं विरुध्द तकार दिली. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदर घटनेचे दोन महिने आधी मी आरोपीं विरुध्द तक्रार दिली होती, पण पोलिसांनी दखल घेतली नव्हती, त्यामुळे मी पोलिस महानिरीक्षक कोल्हापूर, जिल्हा पोलिस अधिक्षक सातारा, उपविभागीय पोलिस अधिकारी कोरेगाव यांचेकडे मी अर्ज दिले होते. त्या अर्जांच्या स्थळप्रती माझेकडे आहेत त्या मी दाखल करु शकतो. पोलिसांनी आरोपींना ताकीद दयावी, कारवाई करावी म्हणून मी सदरचे अर्ज दिले होते. आरोपी व आम्ही

बसून आपसात सामोपचाराने हा मिटणारा विषय नव्हता म्हणून मी वरील कार्यालयास तक्रारी अर्ज दिले होते. वरील सर्व तक्रारी अर्ज गट क्र.८१२/१० व इतर जमिनी संदर्भात होते. पोलिस खात्याकडुन आरोपीं विरुध्द कोणतीही कारवाई झाली नाही. पोलिस काही कारवाई करीत नाहीत म्हणून मी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी आम्ही आरोपींना मारहाण केली त्यावेळी माझे डोक्याला विळा लागला त्याचा गैरफायदा घेवून मी १२ तारखेला आरोपीं विरुध्द खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पुर्ण,

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

(जी.एस.माने)

तारीख :०३/०८/२०२२ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव